वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. ९ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# राज्यातील वक्फच्या सर्व मस्जिद, दरगाह, कब्रस्तानची ५ डिसेंबर पर्यंत उम्मीद पोर्टलवर नोंदणी करावी

## ना.समीर काझी यांचे आवाहन; हयगय करू नका, गाफिल राहू नका आजच नोंदणी करा



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

**बीड,(दिव्य न्युज):- राज्यातील सर्व वक्फ अंतर्गत रजिस्ट्रर्ड असलेल्या मस्जिद, दरगाह, कब्रस्तान यांची दि.५ डिसेंबर २०२५ पर्यंत 'उम्मीद पोर्टल' वर नोंदणी करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी केले आहे. उम्मीद पोर्टलवर सर्व कागदपत्रांची नोंद होणे हे अतिशय आवश्यक आणि सुरक्षित आहे. त्यामुळे कसल्याही प्रकारचा गाफिलपणा, हयगय न करता आजच्या आज नोंदणी करून घ्यावी. कागदपत्रासंबंधी काही अडचण असल्यास त्यांनी तात्काळ वक्फ बोर्डाच्या कार्यालयाशी संपर्क करावा, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल असेही ना. समीर काझी यांनी स्पष्ट केले आहे.**

### वक्फ बोर्डाचे सर्व कार्यालय सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार

महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे राज्यातील सर्व मुख्य आणि जिल्हा कार्यालये दि.५ डिसेंबर २०२५ पर्यंत सुरू राहणार आहेत. सर्व कार्यालयातील नियमित कामकाजाचे डेस्क बंद करून प्रत्येक डेस्कवर ५ डिसेंबर पर्यंत केवळ उम्मीद पोर्टलवरील नोंदणीशी संबंधित कामकाज सुरू राहणार आहे. या कालावधीत सर्व सुट्ट्या रद्द करण्यात आल्या असून पूर्णवेळ सर्व कार्यालये सुरू राहणार असल्याचे काझी यांनी सांगितले.

राज्यातील वक्फ संपत्तीचे व्यवस्थापन पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने करण्यासाठी उम्मीद पोर्टलवर ही नोंदणी आवश्यक आहे. राज्यातील सर्व मस्जिद, दर्गा, कब्रस्तान आणि इतर वक्फ संस्थांनी आपल्या संस्थेची आवश्यक कागदपत्रे ज्यामध्ये नोंदणी प्रमाणपत्र, मालकी हक्काचे दस्तऐवज, विश्वस्त मंडळाची माहिती इत्यादी उम्मीद पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे.

या उपक्रमामुळे राज्यातील वक्फ मालमत्तेचा योग्य नोंदवही तयार होईल तसेच फसवणूक, अनधिकृत वापर आणि गैरव्यवहारांना आळा बसणार असल्याचे त्यांनी ना. समीर काझी यांनी सांगितले. उम्मीद पोर्टलवर नोंदणीसाठी दि.५ डिसेंबर २०२५ ही अंतिम तारीख आहे. त्यानंतर नोंदणी करता येणार नाही. ज्यांची नोंदणी होणार नाही अशा संस्था अनाधिकृत ठरू शकतात. त्यामुळे नोंदणी आवश्यकच आहे. नोंदणीसंबंधी अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी वक्फ बोर्डाच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी किंवा जिल्हा वक्फ बोर्डाच्या कार्यालयाशी संपर्क करावा असे आवाहन अध्यक्ष ना. समीर काझी यांनी केले आहे.


### तेरा जणांची अशासकीय समिती नेमली ; एनजीओ यांनी सेंटर सुरू करण्यासाठी पुढे यावे – समीर काझी

राज्यातील वक्फ अंतर्गत रजिस्ट्रर्ड असलेल्या मस्जिद, दरगाह, कब्रस्तान यांची उम्मीद पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी वक्फ बोर्डाच्या वतीने १३ जणांची अशासकीय समिती नेमण्यात आली आहे. त्यामध्ये जमीयत अर्शद मदनी ग्रुपचे २, जमीयत महेमूद मदनी ग्रुपचे २ , मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे २ , तबलिग जमातचे २, काझी सेवा संघ २ , बरेलीवाले २ आणि वक्फ बोर्डाचे १ नोडल अधिकारी अशा १३ सदस्यांचा समावेश असणार आहे.ही समिती नोंदणी करण्यासाठी मार्गदर्शन करणार असून कागदपत्रासंबंधी अडचणी दूर करण्यासाठी देखील प्रयत्न करणार आहे. त्याच बरोबर बीड जिल्ह्यासह राज्यातील समाजसेवा संस्थानी ( छत्रद्ध ) नोंदणीच्या कामाला गती देण्यासाठी स्वतः हून पुढाकार घेत उम्मिद पोर्टल सेंटर सुरू करावे. त्याठिकाणी संगणकावर काम करणाऱ्या मुलांना राज्य वक्फ बोर्ड मानधन देईल असे समीर काझी यांनी सांगितले आहे.

# 'मातोश्री'वर ड्रोनच्या घिरट्या, उद्धव ठाकरेंची सुरक्षा धोक्यात?

मुंबई, (दिव्य न्युज):- शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे निवास स्थान असलेल्या मातोश्रीवर ड्रोन द्वारे नजर ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या ड्रोनचा व्हिडीओ समोर आल्यानंतर खळबळ उडाली आहे. मातोश्री हे निवासस्थान सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील समजले जाते. मात्र, ड्रोनच्या माध्यमातून नजर ठेवल्याच्या आरोप होत असून आता यावरुन राजकारणही तापण्याची चिन्हे आहेत. तर, दुसरीकडे मुंबई पोलिसांनी या प्रकरणी स्पष्टीकरण दिले आहे.समोर

►► पान २ वर




## प्रभाग क्रं.१७ मधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उमेदवारी जाहिर

# अ मधून मोहंमद असरार तर ब मधून शेख बिलाल यांना उमेदवारी




बीड, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीने आज बीड नगर पालिकेतील नगराध्यक्षांसह सर्व प्रभागातील इच्छूक उमेदवारांची मुलाखत घेण्यात आली. यामध्ये मोठ्या संख्येने इच्छूकांची गर्दी कार्यालयात दिसून आली. ही मुलाखत माजी आ.संजय दौड, डॉ.योगेश क्षीरसाग, फारूक पटेल, बळीराम गवते, अशोक हिंगे, भागवत तावरे यांनी घेतली. सर्व प्रभागातून मोठ्या प्रमाणात इच्छूकांची उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या वाढल्याने पक्ष श्रेष्ठींना आता उमेदवारी देतांना मोठ्या

►► पान २ वर



## भाजप धनंजय मुंडेंना धक्का देण्याच्या तयारीत

# परळीत पंकजाताई मुंडे स्वबळाचा नारा देणार?



बीड ,(दिव्य न्युज):- केंद्रात सत्ता, राज्यातल्या सत्तेत पक्ष मोठा भाऊ आहे. त्यामुळे जिल्ह्यातही पक्षाचे संघटन मजबूत करायचे तर आता होणारी नगर पालिका निवडणुक सर्वच ठिकाणी स्वबळावर लढवावी, असा भाजपमधील काही नेते आणि पदाधिकार्यांचा मतप्रवाह आहे.

बीडमध्ये राष्ट्रवादीने स्वबळाचा नारा दिल्यामुळे भाजपलाही स्वबळाशिवाय पर्याय नाही. तर, परळीतही पक्षाने स्वबळ पॅटर्न राबवावा, असे पदाधिकाऱ्यांचे मत आहे. मात्र, यावर पंकजा मुंडे काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे. जिल्ह्यात बीडसह परळी, अंबाजोगाई, माजलगाव, धारुर व गेवराई नगर परिषदांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. मंत्री पंकजा मुंडेंना पक्षाने जिल्हा निवडणुक प्रभारी तर आमदार सुरेश धस यांना निवडणुक प्रमुख म्हणून नेमले आहे. मागच्या वेळी धारुर, गेवराई नगर पालिकेवर भाजपची सत्ता होती.

तर, बीड, माजलगाव व परळी नगर पालिका राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात होत्या. अंबाजोगाईत त्यावेळी राजकिशोर मोदी यांनी आघाडीच्या माध्यमातून नगर पालिका जिंकली होती. यावेळी अंबाजोगाईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या मोदी विरोधात स्वतः नंदकिशोर मुंदडा रिंगणात उतरण्याचे निश्चित मानले जात आहे. तर, गेवराईत सत्तापालटासाठी अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडित यांनी राष्ट्रवादीकडून ताकद लावत

►► पान २ वर

## सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख फेरोज पठाण यांचे निधन

बीड,(दिव्य न्युज):- शहरातील अशोक नगर केंद्राचे सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी केंद्रप्रमुख फेरोज पठाण यांचे आज सकाळी निधन झाले. त्यांचा दफनविधी आज दुपारी तकिया मस्जिद परिसरातील कब्रस्तानमध्ये करण्यात आली आहे. फेरोज पठाण यांनी जिल्हा परिषद शाळांमध्ये कर्तव्य बजावलेले आहे. त्यानंतर त्यांना केंद्रप्रमुख म्हणून पदोन्नती मिळाली होती. त्यानंतर शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून देखील त्यांना पदोन्नती मिळाली होती. बीड शहरातील सर्वात मोठ्या अशा अशोक नगर केंद्रांचे केंद्रप्रमुख म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम पाहिले. वर्षभरापूर्वीच ते सेवानिवृत्त झाले होते. अंत्यत मनमिळाऊ आणि शांत स्वभावाचे म्हणून त्यांची ओळख होते. केंद्र प्रमुख म्हणून त्यांची कारकिर्द उल्लेखनीय राहिलेली आहे. पठाण कुटुंबियांच्या दुःखात दै.दिव्य न्युज परिवार सहभागी आहे.



# डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातून भाजपाकडून शाहीद सय्यद यांच्या नावाची चर्चा

बीड,(दिव्य न्युज):- डोंगर किन्ही जिल्हा परिषद गटातुन भाजपाकडून धडाडीचे युवा नेत्रत्व शाहीद सय्यद सर यांच्या नावाची चर्चा असून शाहीद सर हे आ. सुरेश आण्णा धस यांचे निष्ठावंत व कट्टर समर्थक म्हणून परिचित आहेत. सामाजिक उपक्रमात अग्रेसर असल्याने सर्व समावेशक चेहरा म्हणून शाहीद सर यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी कार्यकर्ते करत आहेत. पाटोदा तालुक्यातील नायगाव चे मा. सरपंच शाहीद सय्यद सर हे नायगाव ग्रामपंचायत व मयूर मित्र मंडळाच्या माध्यमातून गेली २०वर्षा पासून सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन कृषी, शिक्षण, आरोग्य विषयक बाबीत अनेक गरजूवंताना मदत केली,अनेक गरिबांना शासकीय योजनाचा लाभ मिळून दिला.



अडचणीतल्या लोकांना मदतिचा चा हात दिला.सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन काम करणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख

►► पान २ वर

# दोन्ही राष्ट्रवादीकडेच इच्छूकांचा लोंढा; बीडमध्ये भाजपात सामसुम

### काल संदीप क्षीरसागर यांनी तर आज योगेश क्षीरसागर, अमर नाईकवाडेंकडे मुलाखतीसाठी दिसून आली गर्दी

बीड ,(दिव्य न्युज):- नगरपरिषदेची निवडणूक लढविण्यासाठी बीड शहरात इच्छुकांचा लोंढा दिसून येत असून काल आ. संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी भवन येथे मुलाखती घेतल्या आहेत. तर आज अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस कडून इच्छुकांच्या मुलाखती माजी आ. संजय दौंड, डॉ. योगेश क्षीरसागर आदी मुलाखती घेत आहेत. या दोन्ही राष्ट्रवादीकडे गर्दी दिसून आली आहे. दोन्ही राष्ट्रवादीकडे गर्दी आणि मुलाखतींचा जोर सुरू असताना मात्र भाजपामध्ये सामसुम असल्याचे चित्र आहे.

नगरपरिषद निवडणुकीच्या पोर्शभूमीवर उद्यापासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार असल्याने बीड मध्ये बैठकांचा जोर वाढला असून, दोन्ही राष्ट्रवादीमध्ये सध्या जोरदार रस्सीखेच दिसून येत आहे. प्रत्यक्ष उमेदवारी फायनल करण्या आधी इच्छुकांचे पक्ष पातळीवरील अर्ज भरुन घेण्यात आले आहेत. २६ प्रभाग आणि ५२ उमेदवारांसाठी होणाऱ्या या निवडणुकीसाठी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून नगरसेवक पदासाठी १४८

►► पान २ वर

# आ.संदीप क्षीरसागर यांनी शेख मुजीब यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी द्यावी - झुंजार धांडे



बीड,(दिव्य न्युज):- आ. संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून शेख मुजीब ( दाजी ) यांच्या पत्नी तेजस्विनी दादाराव पारवे यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी जाहीर करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष झुंजार धांडे यांनी केली आहे. सक्षम आणि सर्व समावेशक चेहरा म्हणून जनतेतूनही त्यांच्या नावाला पसंती आहे. त्यामुळे आ. संदीपभैय्या यांनी शेख मुजीब यांच्या नावावर शिक्कामोर्तब करावे असे धांडे यांनी म्हटले आहे.

बीड नगर पालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून शेख मुजीब ( दाजी ) हे योग्य उमेदवार आहेत. त्यांनाच उमेदवारी द्यावी अशी मागणी झुंजार धांडे यांनी केली आहे.



यासंदर्भात त्यांनी आ. संदीपभैय्या यांची देखील भेट घेतली आहे. याबाबत पक्षश्रेष्ठींशी चर्चा करून असे त्यांनी सांगितल्याचे धांडे यांनी म्हटले आहे. बीडमध्ये सध्या केवळ शेख मुजीब यांच्याच नावाची चर्चा आहे. सर्वधर्मीयांना सोबत घेऊन सलोखा जपण्याचे काम त्यांनी केलेले आहे. सर्व समावेशक आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारा चेहरा म्हणून लोक आज त्यांच्याकडे पाहत आहेत. भविष्यात हा चेहरा पक्षासाठी देखील फायदेशीर ठरणारा आहे. त्यामुळेच आज सर्व स्तरातून त्यांच्या उमेदवारीची मागणी होऊ लागली आहे. आ. संदीप क्षीरसागर यांनी शेख मुजीब यांच्या पत्नी तेजस्विनी दादाराव पारवे यांना उमेदवारी दिल्यास आणि ते तुतारी हे चिन्ह घेऊन जनतेत गेल्यास नगराध्यक्ष पदासह बीड नगर पालिकेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचा झेंडा फडकेल असा विश्वास झुंजार धांडे यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे आ. संदीपभैय्या यांनी शेख मुजीब यांची उमेदवारी जाहीर करावी अशी मागणी धांडे यांनी केली आहे.

# आष्टीमध्ये चिरीमिरी घेऊन वाळूचे ट्रक्टर सोडले

आष्टी, (दिव्य न्युज):- आष्टी तालुक्यातील बेलगाव येथे रात्री तीन ट्रक्टरच्या माध्यमातून वाळू चोरी करण्यात आली मात्र पोलिसांना या बाबत माहिती दिल्यावरही पोलिस निरीक्षक भुतेकर यांनी यावर कारवाई केली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून काही तरी चिरीमिरी घेऊन ही चोरी दादाप्विल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यात अलीकडे मोठ्या प्रमाणावर वाळू माफिया हे वाळू तस्करी करत असून या संबंधी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांना ग्रामस्थांनी वेळोवेळी माहिती दिली मात्र या माहितीची योग्य ती दखल आष्टी पोलीस स्थानकाचे प्रमुख पोलीस निरीक्षक भुतेकर हे घेत नसून त्यांनी जोरदार वाळूमाफियांना रान मोकळे केले असल्याचा आरोप करण्यात येत आहे.कालच्या घटने मध्ये देखील पोलीस निरीक्षक भुतेकर यांना या वाळू चोरीबाबत सूचना दिल्या मात्र भुतेकर यांनी या ठिकाणी धाड टाकली परंतु वाळू माफियां यांच्या सोबत चक्क तडजोड करून ट्रक्टर सोडून दिल्याचा ग्रामस्थांनी आरोप केला आहे. पोलीस अधीक्षक कांवत यांना ग्रामस्थांनी रात्री एक वाजता फोन करून काय घडले हे कळविले मात्र त्याच्या नंतर त्यांनी भुतेकर यांना कारवाई करण्याचे आदेश दिले.

प्रत्यक्षात काय कारवाई केली तर हे ट्रक्टर सोडून देण्याची कारवाई करण्यात आली. या संबंधी सकाळी ग्रामस्थांनी याचा जाब विचारला असता योग्य ती कारवाई केल्याचे त्यांनी सांगितले हे विशेष. बीड जिल्ह्यात यापूर्वी पोलीस दलातील भोंगळ कारभाराचे राज्यभर वाभाडे निघाले असताना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था हि अजूनही कशा ढिसाळ पद्धतीने सुरु आहे याचे हे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल. सुरुवातीस पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांचा दरारा बीड जिल्ह्यातील पोलीस दलात दिसून येत होता मात्र आता कांवत यांच्या आदेशाला केराची टोपली संबंधित ठाणे प्रमुख दाखवत असल्याचे आता समोर येत आहे.आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील वाळू तस्करी प्रकरणी पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांना ग्रामस्थांनी रात्री एक वाजता वाळू चोरीची माहिती दिली, त्याच वेळी त्यांनी संबंधित पोलिस निरीक्षक भुतेकर यांना कारवाई करण्याचे आदेश दिले, मात्र भुतेकर यांनी ट्रक्टर सोडून देण्याच्या कारवाईचे आदेशात बदल करून कांवत यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली !

# गेवराईत वाळू माफियांकडून लाच घेताना पोलीस हवालदार रंगेहात सापडला

गेवराई , (दिव्य न्युज):- कुठलेही टेंडर नसताना खुलेआम सुरू असलेल्या अवैध वाळू उपशाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले असतानाच, वाळूमाफियांकडून लाच मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस हवालदार विजय आघाव यांना बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शनिवारी (दि. ८ नोव्हेंबर) २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या वाळू चोरीच्या गुन्ह्यात आरोपी वाळू माफियाला सहकार्य करण्यासाठी हवालदार आघाव यांनी ३० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडअंती २० हजार रुपयांवर व्यवहार ठरला. याबाबतची माहिती बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला मिळताच, उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचला आणि हवालदार आघाव यांना लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. या कारवाईमुळे पोलिस विभागात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, संबंधित घटनेबाबत पुढील तपास सुरू असून, गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# नगर परिषद निवडणूक, नामनिर्देशनपत्र दाखल कालावधीत सुधारणा

बीड , (दिव्य न्युज):- राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर केल्या असून, बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी आणि अंबाजोगाई या नगरपरिषदा निवडणूक कार्यक्रमात समाविष्ट आहेत. या निवडणूक कार्यक्रमानुसार उमेदवारांनी दि. १० नोव्हेंबर २०२५ ते दि. १७ नोव्हेंबर आहेत. २०२५ या कालावधीत नामनिर्देशनपत्र दाखल करायचे यामध्ये अलीकडेच राज्य निवडणूक आयोगाकडून नामनिर्देशन स्वीकृतीच्या वेळेत सुधारणा करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे सचिव यांच्या पत्राद्वारे निवडणूक कार्यक्रमातील मुद्दा क्र. ४ मध्ये दुरुस्ती करून नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अशी स्पष्ट करण्यात आली आहे. यामुळे इच्छुक उमेदवारांनी तसेच विविध राजकीय पक्षांनी नामनिर्देशन दाखल करताना सुधारित वेळेचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि सुव्यवस्थितपणे पार पडावी यासाठी प्रशासन, निवडणूक अधिकारी व पोलीस यंत्रणा सज्ज झाले आहे.

पान ४ वरून

## धांडेंचे आत्महत्याप्रकरण

नेमकं प्रकार साहेब माझा कुटुंबाला परेशानी होऊ देऊ नका. वेळेवर त्यांना माझा पीएफ व इतर वेळेत द्यावे असे आवाहन करीत तुम्ही अभ्यासु आहात माझा तुमच्यावर विश्वास आहे असा मजकूर आहे. यामुळे याची पूर्ण चौकशी करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

मोबाईल नोट पडमधील असा आहे मजकूर १) अनुभव नसतांना डीपीओ संभाजी वाघमारेंनी प्रमोशन दिले; २) निता अंधारेंनी सिआरवर मार्क कमी दिले. ३) सम्राट कदम, विश्वंभर तीडके, चंद्रकांत काळे यांना कंटाळल्याचा मजकूर.

## माजी नगरसेवकांचा

नगरसेवक विकास म्हात्रे आणि त्यांची पत्नी माजी नगरसेविका कविता म्हात्रे भाजपला रामराम करत शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. आज सायंकाळी ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी हा पक्षप्रवेश सोहळा होणार आहे.

भाजप युती धर्म पाळत नसेल, तर आम्हीही गप्प बसणार नाही

भाजपकडून शिंदे गटाच्या नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांचा प्रवेश घेतल्यानंतर शिवसेना एकनाथ शिंदे गटाने आता आक्रमक भूमिका घेतली आहे. उपजिल्हा प्रमुख राजेश कदम यांनी थेट भाजपला आव्हान दिले आहे. भाजपने युती धर्माला तिलांजली दिली आहे. आता एकनाथ शिंदे साहेबांनीही संयम दाखवू नये. भाजप युती धर्म पाळत नसेल, तर आम्हीही गप्प बसणार नाही. मुख्यमंत्री म्हणून तुम्ही जे काम केलं, त्यामुळेच पुन्हा सरकार बसलं. पण जर शिवसेनेला विचारात घेतलं जात नसेल, आमचे नगरसेवक भाजपात घेतले जात असतील, तर साहेबांनी आता संयम सोडावा. कल्याण पूर्वतले नगरसेवक आणि आज काही डोंबिवलीतील शिवसेनेचे पदाधिकारी यांचा सुद्धा प्रवेश करून घेतला आहे. यांना युती नकोय का?, असे ट्वीट उपजिल्हा प्रमुख

## बीडमध्ये जागतिक

की, उर्दू स्टिकर मोहिमेचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये उर्दू लिपीचा प्रसार करणे आणि प्रत्येक व्यक्तीने आपल्या भाषेचा अभिमानाने वापर करावा हा आहे. इतर वक्त्यांनी सुद्धा तंजीम तरक्की उर्दू संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी उर्दू भाषेच्या सेवेत सक्रिय असलेल्या काही सदस्यांना विशेष अभिनंदन करण्यात आले आणि उर्दू स्टिकर मोहिमेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. हा कार्यक्रम उर्दू भाषेच्या जतन, प्रसार आणि सामाजिक अस्तित्व बळकट करण्यासाठी एक सकारात्मक आणि प्रभावी पाऊल ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

पान १ वरून

## ‘मातोश्री’वर

आलेल्या माहितीनुसार, वांद्रे येथील मातोश्री परिसरात एक अज्ञात ड्रोन घिरट्या घालताना आढळला. या परिसरात कोणत्याही प्रकारचे ड्रोन किंवा हवाई साधन उडवण्यास कायद्याने बंदी आहे. मुंबईतील अनेक ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने ड्रोन उडवण्यास मनाई आहे. अशातच आता मातोश्रीवर ड्रोनने नजर ठेवल्याची घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. ठाकरेंच्या सुरक्षेच्या दृष्टीने ‘मातोश्री’ हा उच्च सुरक्षा झोन असल्याने हा प्रकार गांभीर्याने घेतला जात आहे. पोलिसांनादेखील याबाबत कळवण्यात आले आहे. मातोश्री निवासस्थान परिसरात ड्रोनच्या घिरट्या दिसल्याने अनेक चर्चांना उधाण आले. मुंबई पोलिसांनी याबाबतची माहिती दिली असून हे ड्रोन एमएमआरडीएचे असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी एमएमआरडीएने परवानगी घेतली होती. खेरवाडी, वांद्रे-कुर्ला संकुलातील परिसरातील सर्वेक्षणासाठी हे ड्रोन उडवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दोन ड्रोन यासाठी उडवण्यात आले होते.

## परळीत पंकजाताई

संघटन उभारले आहे.

मात्र, भाजपनेही बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांची सांगड घातली आहे. येथून राष्ट्रवादीच्या शितल दाभाडे यांच्या विरोधात भाजपकडून गिता पवार यांचे नाव अंतिम मानले जात आहे. माजलगाव व धारुरमध्येही भाजप तसे मित्रपक्ष राष्ट्रवादी काँग्रेसला तुल्यबळ मानले जाते. धारुरमध्ये डॉ. स्वरुपसिंह हजारी यांच्या जोडीला आता माधव निर्मळ आले आहेत. मुद्दा आहे परळी व बीड नगर पालिकेचा. बीडमध्ये मागच्या काही वर्षांत वरिष्ठ नेत्यांनीच बीडमध्ये भाजप पक्ष वाढीसाठी फारसे प्रयत्न केलेले नाहीत. अलिकडे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, तालुकाध्यक्ष अशोक लोढा, देविदास नागरगोजे आदींनी मंडल समित्या, बुथ कमिट्यांच्या माध्यमातून पक्षाची घडी बसविण्याचा चांगला प्रयत्न चालवला आहे.

पण राष्ट्रवादी काँग्रेस भाजपपेक्षा राजकीय बलवान असल्याने पक्षाने स्वबळाचा नारा दिला आहे. त्यात बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला अनेक मालकं असल्याने युतीती चर्चा करायची तर कोणासोबत असाही पेच असल्याने महायुतीतील रिपाइं व इतर पक्षांसोबत युती करण्यापेक्षा स्वबळावर लढून संघटन आणखी मजबूत करायचे असा दुहेरी मतप्रवाह बीडमध्ये आहे. परळीत मागच्या निवडणुकीत पंकजा मुंडे पालकमंत्री असतानाही निवडणुकीत भाजपचा मोठ्या फरकाने पराभव झाला होता. दरम्यान, महायुतीत दोन्ही पक्ष एकत्र आणि मुंडे भावंडांमध्ये असलेल्या दिलजमाईमुळे परळीत युतीबाबत स्थानिक पातळीवर चर्चा सुरु झाली. तशी राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची एकत्रित बैठकही झाली.

दोन दिवसांपासून मनोज जरांगे व धनंजय मुंडे वादाच्या पार्श्वभूमीवर परळीतील भाजपचे स्थानिक पदाधिकारी स्वतंत्र लढण्याच्या प्रयोगाबाबत चाचपणी करत असल्याची माहिती आहे. पंकजा मुंडे यांनी अलिकडेच जरांगेंबाबत मवाळ भूमिका घेतली आहे तर धनंजय मुंडे जरांगे यांच्या विरोधात अधिकच आक्रमक झाले आहेत. त्यामुळेही परळीतील युतीच्या चर्चेतून भाजप स्वबळाचा प्रयोग करत पदाधिकाऱ्यांना संधी व संघटन मजबूतीसाठी प्रयत्नात आहे.

## अ मधून मोहंमद

वतीने दोन्ही उमेदवारांना कामाला लागण्याचे आदेश देण्यात आले असून या प्रभागातून पक्षाने मोहंमद असरार अब्दुल कदीर तर शेख बिलाल शेख मंजूर यांना उमेदवारी दिली आहे. आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून कोणाला उमेदवारी मिळते याकडे या प्रभागातील मतदारांचे लक्ष लागून आहे. या प्रभागात काँग्रेस, एमआयएम आणि आम आदमी पार्टीच्या वतीनेही उमेदवार उभे केले जाणार आहेत. आम आदमी पार्टीकडून ब मधून सादेक भाई हे निवडणूक लढविणार असल्याची अधिकृत माहिती आहे. शेख असरार आणि बिलाल यांना उमेदवारी मिळाल्याने त्यांनी आज पासूनच प्रभागात प्रचाराला सुरूवात केली असून गाठी भेटी ही घ्यायला सुरूवात केली आहे. आता विरोधी उमेदवार कोण येतो याकडेच आता प्रभागातील मतदारांचे लक्ष लागून आहे.

## दोन्ही राष्ट्रवादीकडेच

जणांनी पक्षाकडे इच्छुकांनी अर्ज भरले आहेत. तसेच नगराध्यक्ष पदासाठी १७ जणांनी अर्ज भरलेले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून ३०० च्या जवळपास इच्छुकांचे अर्ज आलेले असून, नगराध्यक्ष पदासाठी २७ अर्ज आलेले आहेत. यामुळे येथे दोन्ही राष्ट्रवादी कडेच उमेदवारांचा लोंढा दिसत आहे. तर काल आ. संदीप क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी मुलाखती घेतल्या आहेत. दोन दिवस चाललेल्या या मुलाखतींना मोठी गर्दी होती. अनेकांनी मोठे शक्ती प्रदर्शन केल्याचे दिसून आले. यानंतर आज रविवारी (दि.९) सकाळी १०:३० वाजल्यापासून अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने कार्यालयात मुलाखती सुरू आहेत. या मुलाखती माजी आ. संजय दौंड, डॉ. योगेश क्षीरसागर, फारुख पटेल, प्रज्ञा खोसरे, अशोक हिंगे, बळीराम गवते, महादेव धांडे हे घेत आहेत. यावेळी मोठी गर्दी दिसून आली आहे. हे चित्र पाहता शहरात दोन्ही राष्ट्रवादीमध्येच रस्सीखेच दिसून येत आहे. तर उद्यापासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार असली तरी सत्तेत असलेले भाजपामध्ये मात्र सामसुम दिसून येत आहे. ना इच्छुकांची चर्चा ना मुलाखती यामुळे बीड शहरात भाजपाला आपले अस्तित्व ही दाखविता येत नसल्याची चर्चा सुरू आहे. हे चित्र पाहता भाजपाने निवडणुकीच्या आधीच हार मानली का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## डोंगरकिन्ही जिल्हा परिषद

आहे. ते आ. सुरेश आण्णा धस यांचे कट्टर समर्थक व निष्ठावंत कार्यकर्ते असून करून घेतल्या, अनेक लोकांना आरोग्य योजनेचा लाभ मिळून दिला.शाहीद सर यांना प्रशासकीय कामकाजाचा दांडगा अनुभव असून याअनुभवाचा फायदा डोंगरकिन्ही गटातील जनतेचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी होईल.अशी चर्चा मतदार करत आहेत. तसेच सर्व सामान्य लोकांना कधीही उपलब्ध होणारा माणूस म्हणून देखील त्यांची ओळख आहे.त्यांचा जनसपंर्क चांगला असून, ते जनसामान्यचे प्रश्न सोडवण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. डोंगर किन्ही जिल्हा परिषद गट हा इतर मागासवर्गीय या प्रवर्गासाठी राखीव असल्याने शाहीद सर यांना भारतीय जनता पार्टीने डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातून उमेदवारी देऊन सामान्य कुटुंबातील युवकांस काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी कार्यकर्ते, सामान्य नागरिक व मतदार करत आहेत.